# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०१/११/२०२३

# प्रेसनोट

दिनांक ०१/११/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता "चला समजून घेऊ या सोशल मिडीया" ह्या शिर्षकाखाली फोटो व व्हिडीओ शुटींग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन उल्हासनगर महापालिका मुख्यालयातील महासभा सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सुरवातीस सौ. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. महापालिका कर्मचारी श्री. रमेश आव्हाड यांनी एका मराठी भावगीताने सदर कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

प्रा. प्रफुल सुमन हिरामन केदारे यांनी सोशल मिडीयाबाबत उपस्थितांना माहिती करून दिली. एखादी प्रेसनोट बनवितांना त्यामध्ये कोणत्या बाबींचा महत्वाचा उल्लेख असणे व कोणत्या निरर्थक बाबी टाळणे याबाबत सांगीतले. तसेच प्रसिध्दी पत्रक बनवितांना त्यामध्ये "स्थळ, काळ, वेळ, का, कसे, कुणासाठी" या गोष्टींची कशाप्रकारे सांगड घालावी याबाबत उदाहरणासह सुबोध माहिती करून दिली. श्री. अजय दुधाणे यांनी सोशल मिडीयावर फोटो/व्हिडिओ प्रसारित करतांना कोणती काळजी घ्यावी, तसेच फोटो/व्हिडिओ शुटींग कशा पध्दतीने करावी याची प्रात्यक्षिके करून दिली.

मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख व अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर यांनी देखील सोशल मिडीयावर फोटो/व्हिडीओ प्रसारीत करतांना ती कशा प्रकारे करावी व त्यामध्ये कोणत्या चुका टाळाव्यात याबाबत थोडक्यात माहिती दिली. महापालिका प्रशासकीय कामाची माहिती देतांना सदरची माहिती ही अधिकृत प्रतिक्रिया घेऊनच सोशल मिडीयावर प्रसिध्दी करावी अशी सूचना अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर यांनी दिली. तसेच सदरची माहिती ही जास्तीत-जास्त नागरिकांपर्यंत पोहचली जाईल याची दक्षता घेण्यात यावी असा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला. मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांनी प्रशिक्षक प्रा.प्रफुल सुमन हिरामन केदारे, प्रतिनिधी, दैनिक नवाकाळ, दैनिक जनादेश, सहसंपादक भारत न्यूज व श्री. अजय दुधाणे, प्रतिनिधी, साम टी.व्ही. न्यूज मराठी यांचा सत्कार करून आभार मानले.

सदर कार्यक्रमास प्रशिक्षक म्हणून प्रा.प्रफुल सुमन हिरामन केदारे, प्रतिनिधी, दैनिक नवाकाळ, दैनिक जनादेश, सहसंपादक भारत न्यूज व श्री. अजय दुधाणे, प्रतिनिधी, साम टी.व्ही. न्यूज मराठी हे उपस्थित होते. तर महापालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. अशोक नाईकवाडे, मुख्य लेखाधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक श्री. शरद देशमुख, सहा. आयुक्त (साप्रवि) श्री. मनिष हिवरे, पर्यावरण विभाग प्रमुख सौ. विशाखा सावंत, सहा.आयुक्त श्री. गणेश शिंपी, श्री. दत्तात्रय जाधव, श्री. अनिल खतुरानी, श्री. जेठानंद करमचंदानी व अग्निशमन अधिकारी श्री. बाळासाहेब नेटके व इतर विभाग प्रमुख व स्वच्छता निरीक्षक, मुकादम व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.